## मनोज राजपूत

# थरथरणारे हात



# थरथरणारे हात

## मनोज राजपूत

ई साहित्य प्रतिष्ठान

# थरथरणारे हात

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

थरथरणारे हात (ललित)

मनोज राजपूत
१४३, क्रांतीनगर शिरपूर ,जि. धुळे महाराष्ट्र
पिन - ४२५४०५
mob – 9767954100

Email - mnjgirase@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १ मे २०१९

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# लेखकाचे मनोगत



सर्व प्रथम सदा सर्वदा सर्वकाळ सर्वांना मनापासून शुभेच्छा, त्या फक्त आजच्या दिवसा पुरता मर्यादित न राहता संपूर्ण आयुष्यासाठी.

सर्व वाचक, लेखक आणि टीम सर्वांच्या.. आरोग्य, वैभव आणि नाते संबंधात वृद्धी व्हावी हीच प्रामाणिक सदीच्छा. आपल्या ई साहित्य प्रतिष्ठान टीमचे मनापासून आभार व्यक्त करतो. हा माझा तिसरा प्रयत्न..... पुस्तक म्हणण्या ऐवजी प्रयत्नच म्हणेन.

आपल्या मराठी भाषेची व्याप्ती वाढावी यासाठी, नवीन लेखकांना लिहिण्यास प्रोत्साहन आणि वाचकांना नवीन विषय तथा विचार वाचण्यासाठी उपलब्ध करण्याच्या या यशस्वी उपक्रमा बद्दल मनापासून आभार.

मी कायम असच सांगतो, मला पुस्तक आणि त्यासोबत माणसांना वाचणे मनापासून आवडतं. जितकं पुस्तकं वाचून मनुष्य शिकतो तितकंच किंबहुना त्या पेक्षा जास्त लोकांकडून शिकायला मिळतं, असं मला व्यक्तिगत वाटतं कदाचित ते चुकीचंही राहू शकतं पण माझ्या बाबतीत ते खरं आहे.

**लहानपणा पासून एक इच्छा होती. "समोरच्याने काही न सांगता त्याला वाटणारं समजून घेता यावं. मग ते आनंद, दुखं, प्रेम, त्रास अथवा मानवी आयुष्यातील सर्व भावना असतील... "**

या पुस्तकात.... अगदी थोड्याशा मदतीने परिस्थिती कशी बदलते, फक्त मदत करता आली पाहिजे...

मदत तेव्हाच करता येते, जेव्हा ती काय ते ओळखता येते.

नाही तर खूप सारे लोकं शेवटपर्यंत समजू शकत नाही कि मदत नेमकी करायची काय?

अर्थात सर्व काही आपल्याला समजेल असं नाही, पण आपल्या परीने जितकं होईल तितकं नक्कीच करता येऊ शकतं आणि स्वतःला आणि इतरांना आनंदी करता येऊ शकतं. कारण **"आपल्या लहानशा मदतीने समोरच्याला होणारा मोठा त्रास कमी होऊ शकतो किंवा आपल्या त्याच लहानशा दुर्लक्षाने लहानसा त्रास मोठा होऊ शकतो**. " याचा अनुभव आपल्या दैनंदिन जीवनात येतोच.. थोडासा विचार करा नक्की येईल...

मी सध्या पुणे येथे एका सामाजिक संस्थे मध्ये counselor म्हणून कार्यरत आहे. त्यानिमित्ताने देशातल्या विविध जागा, लोकं, ठिकाणी भेट देता येते. मग ते विद्यार्थी सर्व प्रकारचे लोकं भेटतात.. प्रत्येक व्यक्ती वेगळा, त्याचे विचार, गरजा, त्रास वेगळे म्हणून इतर लोकांना समजण्यास मदत होते आणि खूप काही शिकतासुद्धा येतं. **"शब्दांपेक्षा भावनाच खूप काही बोलून जातात. शब्द फक्त साधन असतात" याचा प्रत्यय या पुस्तकात तुम्हाला नक्की येईल**.

शेवटी कल्पनांना मर्यादा असतातच पण, "जेव्हा कल्पनांना सत्य अनुभवाची जोड मिळते तेव्हा मग खूप काही बाहेर येतं. " मग ते टोचणारं, बोचणारं असू शकतं किंवा आनंद देणारं सुद्धा.

शेवटी पुस्तकापेक्षा माणसंच जास्त शिकवतात, नाही का?

हि माझी तिसरी कादंबरी आहे. यात व्यक्तीच्या आयुष्यातला शेवटचा टप्पा म्हणजे म्हातारपण आणि त्यातले अनुभव अशा खूप गोष्टी आहेत.

मानवी भावना, स्वभाव हे तर आहेच पण सर्वात महत्वाचा त्या भावनांना समजून घेण्याचे मन...

जेव्हा कुणी भावनांना समजून घेतं तेव्हा होणारा सात्विक आनंद हा शब्दात सांगण्या पलीकडे असतो. आपल्याला कुणीतरी ऐकतंय हि भावना खूप मोठा मानसिक आधार देते. अंतकरणात प्रत्येका बद्दल प्रेम घेऊन पुढचा प्रवास करता येतो. तो प्रवास "सात्विक" आनंद देतो. कोणत्याही मदतीत जबरद्स्ती नसतेच आणि नसावीच. कारण जबरदस्तीने केलेली मदतही मदत नाही तर उपकार होऊ शकते आणि मला वाटतं कुणालाच मदतीत उपकार नको असतील.

मागच्या दोन पुस्तकाच्या मदतीने खूप साऱ्या वाचकाशी बोलायला मिळाले.

पहिल्या कादंबरीत सात्विक प्रेम ज्याची आजच्या पिढीला नितांत गरज आहे अशी कथा मांडण्याचा लहानसा प्रयत्न केला होता.

**“प्रत्येक गोष्ट पूर्ण चांगली वाटत नाही, काही गोष्टीचं महत्व त्यांच्या अपुर्णतेत असतं”**

दुसऱ्या कादंबरीत देश प्रेम... खोटा देखावा न करता, नाटक न करता, कर्तव्य आणि जबाबदारी आणि नंतर अधिकार असा क्रम लावता आलं पाहिजे.

या तिसऱ्या कादंबरीत मदतीचा हात आणि परतावा म्हणून शाबासकी, मायेचा, प्रेमाचा, आशीर्वादाचा पाठीवर हात... याबद्दल हि कादंबरी आहे.

हे पुस्तक हातात पडणाऱ्या प्रत्येक वाचक, जेष्ठ लेखक यांनी मला या पुस्तकाबद्दल त्याचं मत कळवावं अगदी टीकाही चालेल कारण त्यातून काहीतरी शिकायला मिळेल आणि त्याचा उपयोग पुढच्या पुस्तकात आणि कार्यात करता येईल.

धन्यवाद

शुभेच्छा

BE HAPPY !

मनोज राजपूत

१४३, क्रांतीनगर शिरपूर, जि. धुळे महाराष्ट्र

पिन - ४२५४०५

mob – 9767954100

Email - mnjgirase@gmail. com




http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/tee_manoj_rajput.pdf




http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bharat_mda_manoj_rajput.docx.pdf

**चरणस्पर्श....**

जगात दोन गोष्ट अगदी "**अमूल्य पण मोफत**" असतात "**आशीर्वाद आणि प्रार्थना**" माझ्यासाठी सदैव प्रार्थना आणि डोक्यावर सदैव आशीर्वादाचे थरथरते हात ठेवणाऱ्या माझ्या स्वर्गीय प्रिय आजी-आजोबांना हृद्यपुर्वक अर्पण....

**प्रस्तावना**

मनुष्यप्राणी हा असा आहे कि तो आयुष्यभर काहितरी मिळवण्यासाठी धडपड करत असतो. आणि एक महत्वपूर्ण गोष्ट ती म्हणजे तो जे काही प्राप्त करतो ते करतांना तो शिकत असतो. आयुष्यभर मनुष्य हा विद्यार्थी असतो. शेवटी मरतो त्या शेवटच्या क्षणात देह कसा त्यागला जातो त्याचा अनुभव घेतो. एक गोष्ट मात्र, तो प्रसंग तो कधीच व्यक्त करू शकत नाही.

वृद्धाअवस्था येता-येता त्याला समाजाचे, संसाराचे, आयुष्याचे सारे कटुसत्य त्याने अनुभवले असतात.

नात्यासारख्या नाजूक गोष्ट आयुष्यभर जोपासण्याची धडपड मनुष्य करत असतो. बऱ्याच व्यक्तींकडून नात्याचे धागे सुटतातही आणि तुटतातही पण, काही व्यक्ती ते शेवटच्या क्षणापर्यंत जपून ठेवतात....

अगदी प्रेमाने, मायेने त्यावर फुंकर घालतात....

या नाते-बंधनात अनेक लोकांना खस्ता खाव्या लागतात. काही जेवढी नाती जपतात तेवढ्याच वेदना त्यांना त्या नाते-संबंधात अनुभवायला मिळतात.

खरोखरच पण एक गोष्ट खरी आणि पक्की आहे. माणसाने विनाअपेक्षेने प्रेम द्यावे.... व देत राहावे तर त्याच्या मनाला कुठल्याही वेदना ह्या होत नाही. अपेक्षा केल्या नाही तर त्या भंग पावण्याचे दुखं

कशाला होईल आणि का होईल?

कुठल्याही नात्यात म्हटले ना निस्वार्थ, अमर्याद प्रेम सर्वच काही मिळवून देतं...

निस्वार्थ भावनेत सारं काही येतं. त्यात शुद्ध स्वरुपाची पावित्रता भरलेली असते. एवढी उच्च कोटीची पावित्रता कि तिच्या तेजाने दैदिप्यमान होऊन दगडही परीस व्हावा.... ऐवढे निस्वार्थ प्रेम असावं विनाअपेक्षांचे.... आणि ते या काळात मिळवणं कठीण आहे.

सांगण्याचे तात्पर्य असे कि... अपेक्षा विरहीत केलेले कर्म खूप काही देऊन जातात. हे मी नाही तर निसर्ग सांगतो, निसर्ग नियम सांगतात.

प्रेम करा भरभरून करा पण निस्वार्थपणे करा कारण जीवन फार सुंदर आहे.. असीम आहे.

मुळात प्रेम म्हणजे देणे... आणि फक्त देणेच आहे..

त्यात घेण्याचा काडीमात्र संबध नसतोच...

मनोज राजपूत यांनी आपला थरथरणारे हात नावाचा सुंदर कथा संग्रह मांडला आहे. मानवता नावाच्या परीसरुपी धर्माचा केवढ्या प्रमाणे सुगंधीत स्पर्श करून दिला आहे. त्या आहेत तीन कथा पण त्या नकळत खूप काही शिकवून जातात. मानवी धर्माचे मनात बीज रोवून जातात.

वृद्धत्वावर आधारलेला हा कथा संग्रह आयुष्यरुपी संघर्षाची गोष्ट सांगतो. आयुष्यभर धडपडणारा मनुष्यप्राणी जीवनाच्या शेवटच्या दिवसात आधार शोधतो मग तो मानसिक असू द्या अथवा शारीरिक. थरथरणारे हात का असेना पण ते आशीर्वादासाठी पुढे येतात.. शुभेच्छा द्यायला येतात.. जीवनाचा तुम्हीही चौकसपणे आनंद घ्या म्हणून सांगतात. निमुटपणे जीवनाचे कटू सत्य परिचित करून देतात.

शेवटी एवढेच सांगते.... मानवी धर्माला निस्वार्थपणे जपा !

आशा करते हा कथा संग्रह सर्वांना खूप आवडेल !

मनापासून सर्वच याचे स्वागत करतील...

सर्वच वाचकांना मानवी धर्म जोपासण्यासाठी अनेक शुभेच्छा.... !

सदा.... सर्वदा.... प्रामाणिकपणे....

धन्यवाद.... !

भामरे मनिषा जे.

# थरथरणारे हात

जरी एक अश्रू पुसायास आला
तरी जन्म हा मानवी सार्थ झाला.

**एक.**

आज घरात वीज गेलेली होती. थोडा वेळ वाट पाहून मग मी बाहेर असलेल्या झाडाच्या खाली येऊन बसलो. तिथे जवळच बाजूला एक चौपाई होती. ती चौपाई घेतली आणि..... एक आठवण सहज मनात आली.

**“आठवणी या असतातच अशा, फक्त एक क्षण लागतो, संपूर्ण गोष्ट च आठवते त्या एका क्षणात. ”**

खूप लहान असताना ची एक आठवण आहे. मी शाळेमधून आलो होतो. खूप जास्त उन होतं. घरात बसून राहणे असह्य होतं. मी त्या रण-रणत्या उन्हात बाहेर येऊन अंगणात बसलो. त्या उन्हात बाहेर एक प्राणीही दिसत नव्हता, इतकं ते उन भयानक होतं.

प्रत्येक प्राणी आपल्या आपल्या सोईनुसार कुठे तरी सावलीत शोधून बसला होता. ती दुपारची वेळ जाण्याची वाट पाहत. हे सर्व सुरु असताना समोरून एक म्हातारे बाबा चालत येत होते.... एकटेच, उन इतकं होतं कि चांगल्या पहेलवानालासुद्धा मिनिटात घाम फुटेल, आणि तो गरगरून कुठे तरी सावली शोधेल इतकं ते उन भयावह होतं. पण ते बाबा समोरून चालत येत होते. पायात नावाला चप्पल होती. नावाला म्हणजे अगदी नावालाच. चपलेचं जे काम असतं ते काम करण्यास ती चप्पल शुद्ध अपयशी होती.... म्हणजेच ती चप्पल नावाला होती.

**“प्रत्येक गोष्टीचं ठरलेले काम असतं. तसं त्या चपलेचं काम होतं, तळपायाला संरक्षण देण्याचं, पण ते काम ती चप्पल पूर्ण करू शकत नव्हती.**

**“जेव्हा ठरलेलं काम त्या वस्तू कडून होत नसेल तर चटके दुसऱ्या वस्तू ला लागतात. ”**

अगदी तसंच त्या चपलेच्या योग्य काम न करण्यामुळे चटके तळपायाला लागत होते. मात्र तरी त्या बाबांच्या चेहऱ्यावर चटक्यांचा लवलेशसुद्धा दिसत नव्हता.

दिसत नव्हता कि ते बाबा दिसू देत नव्हते. हे एक न समजलेलं कोडं होतं. कारण आज दाखवण्याच्या या जगात त्रास लपवणे थोड आश्चर्य आहे. आपण वाट पाहतो काही नसलेलं

सुद्धा दाखवण्याची.. आणि त्यात ते बाबा..... जे होतं तेसुद्धा दाखवत नव्हते, पण इथे दाखवायचं कुणाला हा मोठा प्रश्न होता, कारण “दुसऱ्याचं दु:ख बघायला वेळ आहे तरी कुणाला, सर्व फक्त आपले सुख शोधत आहे.

**“जेव्हा मनुष्य फक्त स्वतःच स्वार्थ शोधत असतो तेव्हा दुसऱ्याचं दु:ख दिसणे अशक्य आहे. ”**

हातात एक काळी झालेली, अगदी मळाने माखलेली, जीर्ण पिशवी होती. त्यात काही तरी, गरजेपुरता सामान होता, जो कदाचित त्यांच्या कामाचा असेल. कारण ते बाबा ती पिशवी सोबत घेऊन फिरत होते. त्यांना याची कल्पना होती कि

**“सामान जेवढं कमी तितका प्रवास चांगला, मग तो प्रवास कुठलाही असो, जीवनाचा किंवा फिरण्याचा ”**

मी ते दृश्य पाहत होतो. थोड्याच वेळात बाबा, मी बसलेल्या जागी जवळ येऊन पोहचले. मी घरा बाहेर असलेल्या झाडाच्या सावलीत बसलो होतो. ते बाबाही त्या सावलीत थोडासा विसावा घेण्यासाठी बसले.

त्यांच्या डोक्यावरून येणाऱ्या घामाची धार पाहून मी त्यांना न विचारता पाणी आणायला गेलो. थोड्याच वेळात पाणी घेऊन आलो.

बाबा, पाणी घ्या.. मी म्हणालो

अरे लेका तुला कसं कळल कि मला तहान लागलेली आहे, बाबा म्हणाले

मी त्यांना काहीच उत्तर न देता, चेहऱ्यावर हलकसं हास्य केलं. पण त्या वेळेस न बोललेलं वाक्य आता मनात येत आहे. ते दिलेलं पाणी बाबांनी एका घोटात संपवलं.

**“बऱ्याचदा समोरच्याला काय हवंय हे न सांगता कळलं पाहिजे. कारण प्रत्येक माणूस आपली गरज, त्रास बोलून दाखवलेच असं नाही. ” त्या न बोललेल्या शब्दांचा अर्थ समजता आला पाहिजे. शेवटी समजावून सांगण्यापेक्षा समजून घेणं जास्त महत्वाचे.**

पण त्या वेळेस असं कुणी दाराशी आलं कि आई त्या आलेल्याला आधी पाणी द्यायची तेही समोरच्याने न मागता. हे मी कित्येकदा पाहिलं होतं आणि लहान मन तेच शिकतं जे तो आजू-बाजूला पाहतो.

किती सोपं असतं ना **“एखाद्याच्या चेहऱ्यावर हास्य तयार करणे.** ” पण ते प्रत्येकाला जमत नाही, कदाचित ते प्रत्येकाला जमलं असतं...... तर दु:खी, नाराज कुणी राहिलंच नसतं...

फक्त समोरच्याची गरज, त्रास ओळखायचा आणि ते दूर करण्याचा लहानसा प्रयत्न करायचा. बस्स. कारण

**“बऱ्याचदा लहान-लहान प्रयत्न मोठा बदल करतात”.**

बाबांचं पाणी पिऊन झालं होतं.

चेहऱ्यावर तृप्तीची, समाधानाची छटा स्पष्ट दिसत होती.

तुझं नाव काय बाळा? .. बाबांनी विचारलं,

मी तोंडून शब्द बाहेर काढणार तेवढ्यात

“वेद.. जेवायला ये.”

आई.... आणि आई ची हाक दोन्ही सोबतच आल्या.

छान नाव आहे... “वेद... ” सर्व जीवनाचा सार आणि त्या पलीकडची शिकवण देणारे.. “वेद... ”

“आदी आणि अंत” दोघांच्या पलीकडचे.... बाबा बोलले..

वेदांची एक गोष्ट कदाचित बऱ्याच लोकांना माहित नाही, ती म्हणजे...

वेद रचीयता कोण? हे माहितच नाही.... इतक्या मोठ्या, अद्भुत ग्रंथ. फक्त ग्रंथच नाही तर त्याच्या पलीकडे असलेली, अमूल्य देन ज्यांनी दिली, त्यांनी स्वतःच्या नावाचा कुठेच उल्लेख केला नाही.. का?

मी काही उत्तर देतो... तेवढ्यात बाबाच पुढे बोलले...

कारण कदाचीत तो आपल्यासाठी संदेश असेल आणि शिकवणसुद्धा... कि आपण आहोत तरी कोण? ? ? ?

कसला गर्व आहे आपल्याला? ? .

अहंकार कसला? ? ... ते पुढे काही तरी बोलणार होते...

तो पर्यंत आई जवळ आली होती.

आई थोडा प्रेमळ संताप करत बोलू लागली.

“किती वेळेस सांगायला लावतो रे जेवायलासुद्धा. ” प्रेमळ राग, संताप कसा असतो याचं आयुष्यभर एक छान उदाहरण आईने दिलं. तेही नकळत.

**“एखाद्या आपलाच्या फायद्याची, गरजेची गोष्ट त्याला करायला लावयाची असते किंवा सांगायची असते, तेव्हा केलेला राग, संताप हा प्रेमळ संताप असतो. ज्यात राग हा आपल्या प्रिय व्यक्तीचं चांगलं व्हावं या उद्देशाने असतो. शेवटी प्रत्येक गोष्टीचा मागचा उद्देश काय यावर ती गोष्ट कशी ते ठरत असतं.**

**चांगल्या उद्देशाने केलेलं चुकीचं काम देखील चांगलंच म्हणवतं, हाच आईचाराग, संताप होता जो माझ्यासाठी होता.**

एव्हाना आईचं लक्ष बाबांकडे गेलं होतं. मी काही बोलायच्या आत आई त्या बाबांना म्हणाली, बाबा जेवून घ्या याच्या सोबत.

**माणसाला माणसाची गरज ओळखता आली पाहिजे, ऐकमेकांचं हिसकाहून खाणे तर पशु पक्षी पण टाळतात आपण तर मनुष्य आहोत...**

आईच्या त्या विचारण्याने मी पुरता खुश झालो.

पण बाबा मात्रथोडा विचार करत होते.

मी म्हणालो.. बाबा चला, आई ने मस्त माझी आवडती कढी केली आहे.

किती लहान @@ बालिश @@... होतो मी.

जेवायला कुणी असं बोलवतं का, पण मी खरंच लहान होतो. आणि म्हणाल तर बालिश.... पण ते

**“बालिश पण चांगलंच ज्यात स्वार्थी विचारांची भेसळ नसते. ”**

आई, मला आणि बाबांना पुन्हा बोलावत होती.

पण बाबा मात्र काही तरी विचार करत होते.

आणि शेवटी ते आईला उद्देशून उच्चारले.

ताई..... काही काम आहे का तुझ्या घरात मी करतो.

मला सर्व येतं....

आधी मी ते काम करतो आणि मग जेवतो वाटल्यात. पण आधी नको.

ते मला चांगलं नाही वाटणार.

“स्वाभिमान, ... ”

हा प्रश्न कायम मनात येतोच, बाकींच्या लोकांचा हा “स्वाभिमान” कुठे जातो?

इथे हे बाबा, समोरून दिलेलं घेत नव्हते. आधी काम, कष्ट मग काय तो मोबदला, पण इतर ठिकाणी पाहिलं तर, काम तर दूरच आणि आपल्या हक्काचं तर सोडा... दुसऱ्याच्या हक्काचं घेण्यासाठीसुद्धा लोक विचार करत नाही.. अशा वेळेस आठवतं... कुठे जातो त्या लोकांचा स्वाभिमान? ? ?

बाबा जेवा आधी,

जेवणाच्या बदल्यात काम करायला नाही लावत मी,

आधी जेवा, चला, “आई हसून म्हणाली”

ताई, काम असेल तर सांग, बाबा परत बोलू लागले.

जुन्या पत्र्याचे डबे बनवतो मी...... मला सर्व येतं...

अहो बाबा ते ठीक आहे पण..

आई ला थांबवत ते बोलू लागले..

**ताई.... “तू आज फुकट खाऊ घातलेलं मला पुढे खूप दिवस त्रास देईल गं”**

**या एका वाक्यात मात्र आई काहीच बोलू शकली नाही.**

मी आपला फक्त ऐकत होतो. कोण जिंकतं याकडे लक्ष केंद्रित करत होतो.

अर्थात त्यांच्या संभाषणातला एकहि शब्द मला तेव्हा कळत नव्हता, फक्त जेवायला चला या व्यतिरिक्त.

पण बाकी ते बाबा का नाही म्हणत आहे आणि आई नंतर का शांत झाली हे मला तेव्हा अजिबात कळलं नव्हतं.

**“खूपदा आपल्या क्षमतांच्या मर्यादेमुळे आपल्याला सत्य कळत नाही”**

पण नंतर आई काही वेळ काहीच बोलली नाही आणि मग पाणी घ्या..

त्यावर बाबा.. “दिलं कि तुझ्या वेदा ने आधीच.. ”

ताई काही काम असेल तर सांग करतो मी.

बाबांच्या त्या वाक्यावर मात्र आई घरात गेली आणि थोड्याच वेळात बाहेर आली.

बाबा बाहेर झाडा खाली बसले होते, मी आईच्या मागे मागे फिरत होतो.

ती काय काम आहे ते शोधत होती. तसं तिला काम सांगायचं नव्हतं मात्र..

बाबाच्या मनाला दुखवू पण द्यायचं नव्हतं.

**माणसाला हे जमायलाच पाहिजे कि, द्विधा परिस्थिती कशी हाताळली पाहिजे. कुणी दुखवू नये आणि काम पण झालं पाहिजे. कारण शेवटी चेहऱ्यावरचे भाव, मनाचा आनंद, हेच तुमच्या कामाची पावती देत असतात.**

**“ताई तू आज फुकट खाऊ घातलेलं मला पुढे खूप दिवस त्रास देईल गं”**

हेच ते वाक्य होतं.... तेवढ्यात बाबांचं लक्ष एक बाहेर पडीक ठेवलेल्या चौपाईकडे गेलं.

खराब अवस्थेत होती ती चौपाई..

काही दिवसाआधी आई सांगत होती कि, “त्या चौपाई चं काम करायचं आहे. ”

असं मीच बाबांना बोललो.

मग बाबांनी कसलीच वाट न पहाता. ती जुनी, पुराणी कामात न येण्यासारखी चौपाई बाहेर काढली आणि आपलं काम सुरु करू लागले.

तो पर्यंत आई काम नाही या चिंतेने व्यग्र झाली होती.

ती काही तरी हलकं, बाबांच्या त्या वयाला झेपेल असं काही तरी शोधत होती.

पण मग शेवटी ती बाहेर आली.. बाबा काम नंतर करा आधी जेवा असं बोलणार तोच..

बाबा कामाला लागलेसुद्धा होते.

बाबा ते जरा अवघड होईल असू द्या ते.

पण मग बाबा म्हणाले,

“ अरे ताई..

वयाने म्हातारा असलो तरी काय झालं.. खूप काम केलीत म्हणून अवघड काहि उरलच नाही”.

बाबा सहज बोलले मात्र त्या बोलण्यात एक अनुभवांचा गंध होता. हे मात्र खरं आहे.

**“जेव्हा व्यक्ती खूप साऱ्या त्रासातून संघर्षातून बाहेर पडतो तेव्हा तो त्याच्या क्षमता वाढवून बाहेर येतो, हे नक्की”,**

कारण **अनुभव माणसाला सर्व शिकवतो... सर्व म्हणजे सर्व काही.** आणि अजून विशेष गोष्ट म्हणजे अनुभव कुठे विकत मिळत नाहीत, ते येतात किंवा घ्यावे लागतात. माझ्या मनात विचार सुरु होत गेले.

तू जा मी पूर्ण करतो हे काम.. माझ्याकडे बघत बाबा बोलले “जा वेद बाळा जेवून घे.. ”

मी कुतुहलाने त्या चौपाईकडे बघत होतो.

आता ती पूर्ण रिकामी फक्त चार लाकडाचे दांडे अन बाकी काही नाही. चार उभे आणि चार आडवे. पण नंतर छान दोरीने गुंफून झोपण्यासाठी उत्कृष्ट असं साधन तयार होणार होतं.

तेवढ्यात आई म्हणाली तो नाही जेवायचा आता तुमचं काम संपेपर्यंत. सोबतच जेवेल तो आता तुमच्या..

**मी काही बोलायच्या आत ती सर्व खरं आणि सत्य बोलून गेली. शेवटी आई होती ती, तिला सर्व ठाऊक होतं, आपलं लहान बाळ कसं, काय विचार करतं ते. आपलं बाळ केव्हा कसं वागणार आहे हे तिलाच उत्तम ठाऊक असतं. शेवटी जन्मापासून आणि जन्माच्या आधी पासूनचा प्रत्येक क्षण तिने आपल्याला वाढवलं असतं. म्हणून तिला सर्व माहित असतं... पण... पण हे फक्त लहान असे पर्यंतच.. दुर्दैव आहे पण सत्य..**

**मोठं झाल्या नंतर तिला अजिबात कळत नाही कि आता आपलं पोरगं वागेल कसं? ? काय करेल? ? .**

**लहान असताना शंभर टक्के खरं सांगणारी आई मात्र मोठं झाल्यावर तितका खरा अंदाज लावू शकत नाही आणि लावला जरी.. तरी तो चुकतो.**

**का चुकतो? ?**

**का लहानपणी सर्व अंदाज तिचे बरोबर असतात. मग ते जेवणाचे, भुकेचे रडण्याचे, शांत करण्याचे किंवा अजून दुसरे...... सर्व गोष्टी न सांगता तिला कळतात.**

त्या मागची बरीच कारणे असतील. त्यातलं एक कारण, लहान असे पर्यंत “आपण आणि ती” हेच आपलं आयुष्य असतं. तो पर्यंत बाहेरच्या स्वार्थी, कामापुरत्या, व्यवहार, अशा गोष्टीचा आपल्यावर प्रभाव झालेला नसतो. प्रभाव असतो तो फक्त त्या माउलीच्या निस्वार्थी प्रेमाचा, मायेचा, जिव्हाळयाचा.

जो फक्त आणि फक्त आपल्यावर निस्वार्थी प्रेम करणारी व्यक्तीच देऊ शकते. अशा त्या प्रेमाचा. इतकं सोपं आहे का ते,

**“समोरच्या कडून प्रेम मिळेल किंवा नाही माहित नसतांना त्यावर जीवापाड प्रेम करणं........ ”**

सोपं जरी नसलं तरी ते फक्त आणि फक्त आपल्यावर प्रेम करणारी व्यक्तीच करू शकते इतकं नक्की. देखावा, नाटक करणाऱ्यांसाठीचं काम नाही ते.

**पण मग आपण मोठे होत जातो आणि ते प्रेम जे कायम फुकट मिळत आलेलं असतं, ज्याची किंमत करणेच अशक्य असतं असं ते प्रेम दूर होत जातं,**

कारण त्यात देखावा नसतो आणि आपला विकसित झालेला मेंदू, विचार करणाऱ्या मेंदूला फक्त देखावाच दिसत असतो किंवा देखावाच हवा असतो.

स्वार्थी लोक, स्वार्थी विचार, व्यवहार आणि बरंच काही आपण शोधत फिरतो...... आणि अमुल्य गोष्टीकडे दुर्लक्ष करतो. कारण शेवटी आपण फक्त आपली गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असतो.....

आई आत गेली आणि थोड्या वेळात चहाचे दोन कप घेऊन आली.

चहा तेही दोन कप..

चहा पिण्याची मजा च थोडी वेगळी असते.

पण ती मजा फक्त एका कपात नाही किंवा एकट्यात नाही तर सोबतीला कुणी तरी असल्या वर.

एकट्याने फक्त चहा पिला जातो मात्र दोघांनी मिळून चहा सोबत भावनासुद्धा व्यक्त होतात.

आता बाबाचे काम सुरु झालं होतं. आई ने आधीच सांगून ठेवलं होतं,

“वेद”, मदत करशील पण काम सोपं होईल अशी, काम वाढवून ठेवणारी मदत नको”

मी हसलो, कारण मला समजलं होतं तिला काय म्हणायचं होतं ते.

खरं होतं तिचं..

**माणूस मदत करण्यासाठीच आहे.. पण त्यामुळे समोरच्याचं काम सोयीस्कर होईल अशी मदत हवी काम वाढवणारी मदत नको.**

आई गेली..

मी बाबांजवळच होतो. बाबा तुमचं गाव कोणतं? कुठून आले? आणि काय करता?

असे एक सारखे प्रश्न विचारत सुटलो..

अरे थांब थोडा..

आता मी कुठे आहे.

इथे..

मग हेच माझं आजचं गावं..

आणि आता मी काय काम करतोय..

हेच माझं रोजचं काम.. बाबांनी एक छान पण अर्थपूर्ण आणि त्या लहान वयातल्या मुलाला निट समजेत असं उत्तर दिलं.

आज जेव्हा मी सर्वत्र पाहतो तेव्हा हे जाणवतं, **थोड्या शब्दात समोरच्याला सर्व सांगता येत नाही आणि जास्त सांगितलेलंही समोरच्याला सहज समजत नाही. कारण आपल्याला ऐकता येत नाही, ऐकायला येत नाही किंवा ऐकायचं नसतं.**

बाबा तुमच्या घरी कोण-कोण असतं..? ?

आहे कि बाळा, मला खूप मोठं परिवार आहे.

मी रोज एक एक आप्तेष्टांना भेटायला जातो. आज तुमच्याकडे आलो आहे.

तू माझा नातू आणि तुझी आई माझी मुलगी.

बरोबर ना...

तेव्हा त्या लहान मला ते मज्जा देणारं वाक्य होतं, मात्र आज जेव्हा त्या चौपाई वर बसून विचार येतो त्या वाक्याचा, तर क्षणात कळतं, किती मोठं हृदय असावं त्या बाबांचं,

जे, आपला एक पत्ता असून कुणाला सांगू शकत नव्हते.

मी रोज माझ्या एका एका नातेवाईकाला भेटायला जातो. बाबा बोलले.

मी विचारलं, रोज

हो रोज... ते उत्तरले

चल आपण छान चौपाई गुंफू.

आम्ही बोलत बोलत काम करत होतो.

सर्वात आधी बाबांनी नारळाची दोरी मला पाण्यात टाकायला सांगितली.

मी पाण्यासोबत खेळत ती दोरी पाण्यात टाकली.

न राहून त्या बादलीतल्या पाण्यासोबत खेळण्याचा मोह आवरला गेला नाही. आई कपडे धूत असताना तर मी रोजच त्या पाण्यासोबत खेळतो. किती आनंद देणारं असतं ते.

बाबा दोरी ओली का करतात? मी पुन्हा प्रश्न केला.

बाबा त्यावर उत्तर देत म्हणाले,

बाळा, सुखलेली, कोरडी दोरी हाताला लागते, जखम करते आणि पकड बसण्याला त्रास देते.

दोरी ओली असली कि छान पकड, ताणायला पण सोपी जाते आणि.. आणि.. काही तरी स्वतःशीच पुटपुटले, “जखम पण देत नाही. ”

**“आयुष्याचं पण असंच असतं, प्रत्येक नातं, संबंध हे जर सुखलेले असतील तर त्यांना प्रेमाच्या, मायेच्या पाण्यात नक्कीच बुडवून ठेवावं.”**

**"त्यामुळे पुढच्या आयुष्यावर पकड येते आणि ते जगायला सोपंही जातं. आपण ते सुखलेले नातं ओढत ताणत गेलो कि मग त्रास होतो, जखम होते. "**

हे ते स्वताशीच म्हणाले..... कारण सरळ होतं माझ्या त्या लहान बुद्धीला ते अजिबात समजणारं नव्हतं. मात्र आज त्याचा अर्थ कळतो आहे.

हळू हळू आमचं काम सुरु होतं. एक एक टप्पा आमचा पुढे जात होता.

हळू हळू फक्त लाकडाचे उभे आडवे दांडे आता एक कामी, उपयोगी येणाऱ्या चौपाईत रुपांतरीत होत होती.

कोणतीच गोष्ट एका दमात होत नाही, हेच सत्य.

**"प्रत्येक गोष्टीला तीचं योग्य परिपक्क रूप घेण्यासाठी योग्य तो काळ लागतोच "**

जसं बाळाला जन्म घेण्यासाठी ९ महिन्याचा कालावधी लागतोच तसं प्रत्येक परिपक्क गोष्टीलासुद्धा लागतो. आणि जर तो योग्य वेळ नाही मिळाला तर ती वस्तू गोष्ट तितकी परिपक्क होत नाही. मग ते premature जन्माला आलेलं बाळ असेल किंवा घाई घाईत तयार झालेलं नातं. किंवा अजून वेगळं काही. पण सत्य हेच आहे कि,

**"जगातल्या कोणत्याही वस्तूला तो योग्य कालवधी, तो योग्य वेळ लागतोच तीचं परिपक्क रूप घेण्यासाठी "**

मी मधेच बाबांना प्रश्न विचारत होतो. बाबा मला भूक लागली आहे करा लवकर अजून किती वेळ.

हो बाळा लवकरच करतोय..

पण घाईत केलं तर चुकेल ना ते..

त्यात काय चुकायचं सोपं तर आहे ते.

एकदा इकडून आणि एकदा तिकडून दोरी ओवली कि बस झालं. असं मी सहज बोलून गेलो. कारण तेव्हा मी लहान होतो आणि लहान, बुद्धी कमी असतांना व्यक्ती चुका सहज करतो.

अजून काय असतं बाबा, सोपं तर आहे. बघा मी करतो, बाबांच्या हाता मधून दोरी घेत मी बोललो आणि समोर असलेल्या दोऱ्या मधून ती ओवू लागलो गुंफू लागलो.

एकदा खालून एकदा वरून जसं बाबा करत होते तसं मी करू लागलो.

पण थोड्या वेळ केल्या नंतर लक्षात आलं कि मी जे केलं होतं ते अगदी चुकीचं होतं आणि त्यामुळे काम वाढलं होतं, दोरीची गाठ तयार झाली होती.

आई ने सांगितलं होतं कि मदत करशील पण काम वाढेल अशी मदत नको.

ती मदत असेल का... ज्यामुळे समोरच्याचा त्रास वाढत असेल?

माझ्या कानात ते शब्द क्षणात आठवून गेलेत.

मग बाबांनी माझ्या हातातील दोरी घेतली आणि बोलू लागले.

फक्त उभं आणि आडवं नाही...

तर योग्य ठिकाणी गुंफाव लागतं.

बघ.. असं

मग बाबांनी मला करून दाखवलं..

मी कुतूहलाने बाबांना विचारलं

असं बरोबर कसं गुंफता येत तुम्हाला चुकत नाही का? माझा प्रश्न ऐकून बाबा हसले आणि बोलू लागले

जेव्हा काही गोष्टी एकमेकांमध्ये गुंततात, गुंफतात तर उत्तम असं कामाचं तयार होतं.

फक्त एकच महत्वाची बाब असते, ते व्यवस्थित गुंफता आलं पाहिजे.

**योग्य गुंफण एक झोपण्यासाठी उत्कृष्ट चौपाई तयार करते तर चुकीची गुंफण दोरीची न सुटणारी व त्रास देणारी गाठ तयार करते.**

आणि आयुष्याचं पण असंच असतं.

**नात्यात, जीवनात योग्य व्यक्तीशी केलेली योग्य गुंफण छान नातं, आयुष्य तयार करते जे सुखकर, उत्कृष्ट, जगण्याला आधार देणारं. जीवन सोयीस्कर करणारं असतं. तर दुसरीकडे त्याच नात्यात जीवनात चुकीची गुंफण होत गेली कि न सुटणारी, त्रास देणारी गाठ तयार होते आणि मग पुढचं सर्व त्रास देणारंच होत जातं.**

मला काही समजवण्याच्या भाषेत बाबा बोलत होते. आमच्या गप्पा सुरूच होत्या आणि बाबांचं काम पण पूर्ण होत आलं होतं.

आता काम संपलं होतं. आई ने ताट आधीच तयार करून ठेवले होते. आधीच्या जेवणाच्या पक्वान्नामध्ये दोन-तीन **मेनू** वाढले होते. आम्ही काम संपवून घरात गेलो त्या आधी आई ने हात धुण्यासाठी पाण्याची बादली ठेवली होती. मी गेलो आणि पाण्यासोबत खेळत आणि भराभरा दोनतीन तांब्या पाणी ओतलं.

बाबा माझ्याकडे बघत होते.. माझ्या कृतीकडे ते निरखून पाहत होते.

नंतर त्यांनी एक तांब्या पाणी घेतलं आणि त्यातच हात धूत थोडं पाणी उरवत बादलीत टाकलं.

तेव्हा त्यांनी एक छान पण तेव्हा न कळलेली मात्र आता आयुष्यात उपयोगी पडणारी गोष्ट एका वाक्यात सांगितली.

या पुढे लागेल तेवढंच पाणी घे हात धुण्यासाठी..

"**लागेल तेवढा घेण्याच्या वृत्तीला दैवी वृत्ती म्हणतात आणि गरजेचं नाही तरी घेण्याच्या वृत्तीला राक्षसाची**. "

तेव्हा त्यांनी ते त्या लहान मुलाला समजेल या भाषेत जरी सांगितलं असलं, तरी आज मोठा होऊन जेव्हा विचार करतो आणि अभ्यास करतो तेव्हा एक लक्षात येतंच कि.

**"या जगात सर्वांच्या गरजा पूर्ण होतील असं सर्व आहे, पण ते फक्त गरजा पूर्ण करण्यासाठी आहे...... हाव, लोभ, लालसा पूर्ण करण्यासाठी नाहीच. "**

तो एक लहानसा प्रसंग खूप काही शिकवून गेला.

कसं असतं ना, आयुष्यात खूप लहान गोष्टी, प्रसंग आपल्याला फक्त माहिती देत नाहीत तर जगणं शिकवतात.

ते खरं जगणं ज्यात स्वतःच्या उन्नती बरोबर, दुसऱ्यांची उन्नतीसुद्धा सामावली असते.

एक विचार मनात येऊन गेला

मी आणि बाबा जेवायला बसलो.

मी खूप मज्जा करत जेवत होते.

आमचं जेवण झालं होतं, बाबाचं पण जेवून झालं होतं.

आणि आता थोडा आराम करा असं आई आम्हाला सांगत होती पण बाबा नाही म्हणाले मग,

आई ने दुसऱ्या मार्गाने सांगितलं.

बाबा याला जरा नवीन चौपाईवर बसवा तो पर्यंत मी थोडं काम करते.

आता बाबांना नाही म्हणणे शक्य नव्हतं, त्यांनी ते केलं.

आई कामाचं सांगून बाबांच्या पिशवी जवळ गेली आणि कुणाला न दिसता तिने त्यात पैसे टाकले. कारण तिला माहित होतं. जर बाबांना पैसे दिले तर ते घेणार नाही जरी त्यांना गरज असली तरी.

पण पुन्हा तेच.

खूपदा समोरचा आपली गरज सांगत नाही ती आपल्याला ओळखावी लागते.

पण मला सर्व दिसत होतं अर्थात मी ते सर्व पहात होतो.

बाबा थोडा वेळ झोपले आणि थोडा वेळ आराम करून पुन्हा निघाले.

आपल्या पुढच्या प्रवासाला.

पण जातांना ते माझ्या पाठीवर एक आशीर्वादाचा हात, थाप देऊन गेले जी मला अजून आणि या पुढे कायम लक्षात राहील.

तो थरथरता हात, ज्यात त्राण नव्हता....

तो थरथरता हात, ज्यात शारीरिक ताकद नव्हती....

पण तो थरथरता हात ज्यात........

आशीर्वाद देण्याची क्षमता जी इतर कोणत्याच हातात नव्हती.

मनातून.. मनाच्या गाभाऱ्यातून...

बाबा पुढच्या नातेवाईकाला भेटून झालं कि पुन्हा या

मी म्हणालो.

हो नक्की..

आणि नंतर त्या दिवसा पासून प्रत्येक उन्हाळयात मी आवर्जून घरी जातो. त्या बाबांच्या थरथरत्या आशीर्वादाने भरलेला हात पाठीवर घेण्यासाठी.

**नाती लाल असणाऱ्या रक्ताची असतात हे जर खरं असेल तर....**

**सर्वांच्या शरीरातलं रक्त लालच आहे. आणि त्यामुळे कुणाशीही नातं जुळू शकतं.**

पण ते एका कडून कधीच होऊ शकत नाही.

कोणतेही नाते किंवा दुसरं काहीही एके कडून नसावंच कधी..

**एके कडून असणाऱ्या कोणत्याच गोष्टीला ध्येय नसतं, शेवटचा थांबा नसतो.**

ते भरकटत जातं, जिकडे रस्ता भेटतो तिकडे, ते वाहत जातं जिकडे नदीचा प्रवाह घेऊन जाईल तिकडे.

म्हणून कोणतीच गोष्ट एके कडून नसावी.. अगदी प्रेम, भावना आणि नातंसुद्धा.

आजसुद्धा मी या उन्हात झाडा खाली, बाबांची योग्य तऱ्हेने गुंफलेल्या चौपाईवर त्यांची वाट पाहत बसलो आहे. हि चौपाई जी मला योग्य गुंफलेल्या गोष्टीचं महत्व सांगते कायम.

**जर गोष्ट योग्य गुंफली तर ती योग्य काम असणारी तयार होते.**

**आणि जर चुकीचं गुंफली तर न सुटणारी गाठ आणि गुंता तयार होतो. जो त्रास दायक असतो.**

**हे बाबांचे शब्द मी माझ्या जीवनात प्रत्येक ठिकाणी उपयोगात आणतो नात्यात... कामात... जगण्याच्या प्रत्येक ठिकाणी.**

## दोन

अचानक ब्रेक दाबल्यामुळे सर्वांच्या शिव्या पुढे बसलेल्या विष्णूला मिळाल्या, गाडी चालकाला न बोलताच, मित्राला बोलत सर्वांनी तोंड सुख घेतलं.

का रे विष्ण्या अक्कल आहे का जरा, रवी जोरात ओरडत म्हणाला.

याला फक्त हौस गाडीत पुढे बसायची, रस्ता तर समजत नाही पण म्हणे मी रस्ता दाखवणार, गोकुळ ओरडला.

उतरवा याला खाली आणि सोडा इथेच याला इथे, मस्त झोपलो होतो, संत्या झोप मोडल्यामुळे संतापला. विष्णू शांत ऐकत होता. माझ्याकडे बघत म्हणाला “वेद”, तुलाही काही बोलायचं आहे का?

मी काही न बोलताच मान हलवत नकार दिला. कारण मला त्याचं प्रयोजन समजलं होतं.

मात्र थोडा वेळ श्मशान शांततेत गेला. थोड्या वेळानंतर सर्वच बाहेर बघू लागले बाहेर एक पुरातन शंकराचे देऊळ होतं आणि आज महाशिवरात्री होती.

एका क्षणात आधीचे सर्व बोललेलं प्रत्येकाला आठवलं.

रवी ला त्याचं.. गोकुळ ला त्याचं आणि इतरांना आपापलं.

विष्णू काहीच बोलला नाही. कारण न बोलताच परिस्थती सर्व काही बोलून गेली होती. सर्वांना त्यांच्या त्यांच्या वाक्यावर पश्चात्तापाची भावना आली होती.

सर्व विसरून सर्व आनंदाने बाहेर आले, कारण बाहेर एक पुरातन महादेवाचं देऊळ आणि आज दिवस देखील महाशिवरात्रीचा.

तसं देऊळात जाण्यासाठी प्रत्येक दिवस उचित असतो. पण तरी काही दिवस विशेष असतातच. तशातला हा आजचा दिवस.

आम्ही सर्व गाडीतून बाहेर आलो आणि दर्शन घेण्यासाठी देऊळाकडे जाऊ लागलो.

प्रचंड गर्दी होती आज, देवालयात गर्दी असणे स्वाभाविक आहे.

मला कायम प्रश्न पडतो?

का बरं लोक देवाकडे येत असावेत?

प्रत्येकासाठी कारण वेगवेगळी आहेत. **कुणाला आनंद झाला असतो.**

**कुणाला आनंद मिळणार असतो. कुणाला तो मिळावा म्हणून, कुणी प्रसाद द्यायला, कुणी नवस सोडवायला** तर कुणी कशाला तर कुणी कशाला, बरीच वेगवेगळी कारणे असतात.

पण सर्व कारणांच्या मागे एकच दुर्दैवी पण सत्य कारण आहे ते म्हणजे सर्व काही ना काही मागण्यासाठी आले असतात.

वरकरणी काही तरी देण्याचा देखावा जरी लोकं दाखवत असले किंवा तसं दिसत जरी असलं तरी, कारण हे मागणे हेच असतं.

**पण एक गोष्ट तितकीच खरी आहे देव स्वतासाठी मागणाऱ्याना देत नाहीच...**

आम्ही सर्व रांगेत उभे होतो. विष्णू, रवी गोकुळ आणि मी सर्व रांगेत पुढे पुढे जात होतो.

देऊळ खूप भव्य होतं, प्राचीन, म्हणून त्याला जास्त महत्व प्राप्त होतं.

देऊळात का जावं हे प्रत्येकाच्या व्यक्तिगत विचारांवर जरी अवलंबून असलं तरी फक्त मागण्यासाठी मुळीच जाऊ नये आणि देव ते देणारच नाही हे देखील लक्षात ठेवावं. पण लोकांच्या स्वार्थी विचारांना थांबवणे अवघड आहे.

खूप वेळेनंतर आत गेलो,

देऊळ अगदी प्रशस्त होतं. मोठा परिसर पण मला अनुभव आलेली सर्वात महत्वाची गोष्ट आणि ती प्रत्येक मंदिरात जाणवते, सर्वांना जाणवेल ती म्हणजे मनाला एक अलौकिक शांतता हि प्रत्येक मंदिरात लाभते फक्त स्वार्थासाठी मागणाऱ्यांची तिथे कमतरता पाहिजे.

ती शांतता असण्यामागचं शास्त्रीय कारण आहे. ते असं कि, कितीही केलं तरी येणारे लोकं चांगल्या भावनेने देऊळात येतात, वाईट विचार कमी प्रमाणात असतात आणि रोज किती तरी लोकं येतात. त्यामुळे प्रचंड प्रमाणात सकारात्मक तरंग तिथे उत्सर्जित होतात. त्यामुळे देऊळ परिसरातलं वातावरण प्रसन्न आणि अल्हादायक असतं हे सर्व मी विष्णू, रवी, गोकुळ यांना सांगत होतो.

तेवढ्यात रवी मध्येच बोलला,

वेद, हो यार खूप शांतता, प्रसन्न वाटत आहे रे

मनालाही आणि डोळयांनासुद्धा...... हे सर्व बाजूला असलेल्या कॉलेजच्या सहलीसाठी आलेल्या मुलींकडे बघत तो बोलत होता.

विष्णू, गोकळ्या संत्या.. लेका खरं आहे ना.... वाटते ना शांती..

अरे काही लाज रे तुला, विष्णू रागात बोलला..

कुठे आहोत आपण.. जरा भान...

काय यार देवाचं देऊळ पण नाही सोडत हा.. विष्णू पुरता चिडला.

थोडा वेळ शांतता आणि तो पर्यंत आम्ही देऊळाचं दर्शन करून बाहेर आलो.

मित्रानो तुम्ही फिरा थोडा वेळ मी जरा इथेच आहे.

शांती शोधतोय का? ? रवी बोलला

मी जरा रागातच याच्याकडे बघत बोललो,

हो शांती शोधतोय पण ती वाली नाही जी मगाशी तू बघत होता.

ऐकून तो तेथून निसटला..

मला त्या देऊळाची वास्तुकला बघायची होती, हजारो वर्षापूर्वी बांधलेलं ते देऊळ, त्याची नक्षी काम आणि मनाला मिळणारी शांतता अनुभवायची होती.

मी मंदिराच्या गाभाऱ्यातून बाहेर समोर येत होतो एक प्रश्न मला कायम असायचा **देवाच्या देऊळात जिथे देवाची प्रतिमा, मूर्ती अथवा देव स्वत असतात त्या जागेला “गाभारा”, “गर्भ गृह” का म्हणतात**? ? ?

असा प्रश्न मला कायम येतो. थोडं अनुभवाने त्याचे उत्तर मिळालं ते पूर्णपणे खरं आहे असं माझं मुळीच म्हणने नाही.

**मला तरी वाटतं, जगातल्या सर्वात्त सुरक्षित जागा जर कोणती असेल तर ती म्हणजे एका मुलासाठी, बाळासाठी आईच्या गर्भा शिवाय दुसरी कोणती नसेलच, आणि म्हणून जिथे सर्व**

**सुरक्षित असतं, भीती ती कशाचीच नसते, अशी जागा मग ती देवासाठी का असेना.. ती गर्भगृह, गाभारा असणार..**

मनात विचार सुरूच होते कि लक्ष समोर असलेल्या एका वयोवृद्ध आजी वर गेलं.

ती त्या गर्भगृहा समोर बसली होती बसली होती. अगदी शांत.

जणू त्या जगातल्या सर्वात सुरक्षित जागेसमोर स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी. खूप लोकं तिच्या समोरून जात होते, कुणाचंच लक्ष तिच्या वर नव्हतं आणि ती आजी कुणाचं लक्ष तिच्याकडे जावं असं काही करतही नव्हती.

मी तिच्याकडे एक सारखं बघत होतो

**“निरीक्षणावरून आपण एखाद्याबद्दल सर्व खरं वर्तवू शकतो. फक्त दुसऱ्याच्या मनापर्यंत पोहचता आलं पाहिजे.. फक्त परिस्थिती बघून सर्व सत्य ओळखता येतं”** मनात अर्थ लागत गेले.

तिच्याकडे बघून फक्त हेच विचार आले. जे त्या आजीला बोलयचं होतं ते माझ्या मनातून ती जणू बोलु लागली.

**“कधी कधी दुसऱ्याचा आवाज, दुसऱ्याचे शब्द होण्यातला आनंद खूप वेगळा असतो.”**

**“ प्रत्येकाला दुसऱ्याचे शब्द व्यक्त करता येत नाहीत. अथवा दुसऱ्याचे स्वप्नसुद्धा बनता येत नाही. पण खूप सात्विक आनंद मिळतो दुसऱ्याचे शब्द, दुसऱ्याचे स्वप्न पूर्ण करण्यात. ”**

दोन्ही हात एकमेकांना जोडलेले, बाजूला देवाची प्रतिमा, समोर थोडे सुट्टे पैसे, हात अगदी सुरकुत्या पडलेले, पूर्ण शरीर जीर्ण अगदी शरीराची कात खाली येईल कि काय असं असलेलं शरीर, चेहऱ्यावरचे भाव फक्त आणि फक्त चेहरा वाचणाऱ्यालाच कळावे.. जणू ते भाव सर्वांसाठी नाहीतच. चेहऱ्यावरील प्रत्येक सुरकुती काहीतरी सांगणारी. पाणावलेले डोळे, वर अश्रू न दिसणारे मात्र, त्या न दिसणाऱ्या अश्रू मागे दाटलेले पाणी. चेहऱ्यावरचा भाव जो स्वाभिमानाचा होता मात्र आता तो स्वाभिमान कुठे तरी हरवला आहे असं वाटत होतं. ते भाव घेऊन ती आजी त्या देऊळच्या बाहेर येणाऱ्या प्रत्येक भक्ताला काही तरी सांगत होती. जर कमी शब्दात सांगायचं तर

“ते सर्व भाव, तो चेहरा, ते डोळे सर्व काही अपेक्षेने भरलेलं होतं मात्र.. ती अपेक्षा सर्वाकडून पूर्ण व्हावी अशी इच्छा नव्हती किंवा सर्वांना दिसावी अशीसुद्धा इच्छा नव्हती. **लाचारी युक्त अपेक्षा ती नव्हती**, सन्ममाने ती पूर्ण व्हावी, दयेयुक्त भावनेने ती पूर्ण व्हावी असं मुळीच नव्हतं ” कारण

**“कदाचित तिला माहित होतं या पवित्र ठिकाणीसुद्धा स्वार्थी लोक असतील आणि जिथे स्वार्थ.. तिथे दुसऱ्याचा त्रास दिसणे निव्वळ अशक्य. हे सर्व ती आजी तिच्या आज पर्यंतच्या अनुभवातून समजू शकत होती. त्या पवित्र मंदिरात जरी सर्व देवाकडे मागण्यासाठी आले असले तरी ते मागणं फक्त आणि फक्त त्यांच्या स्वतःसाठी होतं. स्वार्थाने माखलेलं, दुसऱ्यांच्या दुखावर फुंकर न घालता येणारं.**

**मला कायम प्रश्न पडतो? ? ? देव काय मूर्ख असणार का !!!!!**

**“कि स्वतःसाठी, स्वार्थासाठी आलेल्या नाटकी भक्ताना खरा आशीर्वाद देईल.**

**कुणी तरी दया दाखवत आहे हि भावनाच काहीना दुख देऊन जाते. ”**

**(बऱ्याचदा न दिसणाऱ्या गोष्टी मागे खूप काही अर्थपूर्ण गोष्टी असतात, ज्या कुणाला सांगण्यासाठी नसतात तर आपोआप समजण्या करिता असतात )**

**जेव्हा कायम हसणारा चेहरा, खूप बोलणारे शब्द, दुसऱ्यांसाठी प्रार्थना करणारे अचानक शांत होतात. आणि फक्त आणि फक्त होणारी परिस्थिती निमुटपणे सहन करत असतात. तेव्हा.. जगाच्या पाठीवर शब्द नसावा ते व्यक्त करण्यासाठी (state of emotion)**

व्यक्ती नुसार वागण्याची पद्धत वेगळी असते तसं येणारे भाविक, देवाचे भक्त म्हणवून घेणारे, काही लोकं तीचं ऐकत होते काही दुर्लक्ष करत होते. देवळात सर्व लोक काही तरी सांगायला येतात, मागायला येतात. इच्छा अपेक्षा ज्या पूर्ण व्हाव्यात, ज्या पूर्ण झाल्यावर आनंद मिळणार असतो अशा सर्व गोष्टी ते सांगायला येतात. देव ते शांतपणे ऐकतो सुद्धा.

**कुणी तरी आपल्याला ऐकत आहे हि भावना माणसाला खूप संतुष्टी देते. तसच ती आजीसुद्धा तिथे कुणी तरी ऐकावं यासाठी आली होती.**

मी त्या आजी जवळ गेलो.. आणि जवळ असलेलं सर्व तिला दिलं, पण ते देण्याआधीच तिचा तो थरथरनारा हात..... जो सदैव आशीर्वादासाठी पुढे असतो अगदी न मागता. आशीर्वाद तोसुद्धा मनापासून.

**“ज्या गोष्टीत बनावटपणा, देखावा, ढोंग नसतं ती पवित्र, शुद्ध, प्रभावी असतेच. ”**कदाचित ती आजी त्या सुरक्षितेसाठी तिथे आली होती.

“**प्रत्येकाला कुणी तरी आपल्याला ऐकावं असं वाटत असलं तरी सर्वांना ते नशीब लाभतंच असं नाही”**मग शोध सुरु होतो. जिथे मन थांबेल तिथला. शेवटी पर्याय म्हणून **जगातल्या सर्वात सुरक्षित जागेचा, जी फक्त आईकडेच असते पण ते न मिळू शकल्यामुळे दुसरा पर्याय.. फक्त पर्याय म्हणून देवाचे गर्भगृह.**

अजून तो हात माझ्या स्मरणात आहे आणि यापुढे कायम असणार,

“**व्यक्ती विसरतो त्याच गोष्टी ज्या महत्वाच्या नसतात**”.

हात विसरता येऊ शकतो **मात्र “थरथरणारा...... आशीर्वादासाठी पुढे आलेला हात विसरणे? ? ? निव्वळ अशक्य”**



मी परत गाडीत आलो होतो मात्र सोबत तो थरथरता हात आणि त्या हाताने दिलेला आशीर्वाद घेऊन.

जेव्हा कायम हसणारा चेहरा, खूप बोलणारे शब्द, दुसऱ्यांसाठी प्रार्थना करणारे अचानक शांत होतात. आणि फक्त आणि फक्त होणारी परिस्थिती निमुटपणे सहन करत असतात. तेव्हा.. जगाच्या पाठीवर शब्द नसावा ते व्यक्त करण्यासाठी (state of emotion).

पण तरी ते दुखावलेलं मन ज्यातून फक्त संताप निघाला पाहिजे, द्वेष निघाला पाहिजे.. तरी ते आपल्यांसाठी फक्त आणि फक्त प्रार्थना करतात. सामान्य विचारा पलीकडे आहे हे सर्व.

## तीन

काम, काम आणि काम... काय असते हे काम...

कायम करावंच लागतं हे काम.

मग त्याला कुणी जॉब तर कुणी सर्विस तर कुणी अजून उपजीविका भागवण्यासाठी करत असलेला धंदा आणि काहीच्यासाठी असेल तर बिजिनेस..

असे ते काम, ठरलेलं काही मिळण्यासाठी... काय मिळण्यासाठी ते नका विचारू कारण प्रत्येकाला त्यातून काही तरी वेगळंच मिळतं. कुणाला पैसे मिळतात, कुणाला मान सन्मान मिळतो कुणाला प्रसिद्धी मिळते कुणाला समाधान मिळतं. तर कुणाला काही वेगळं. यात दोन प्रकार असतात. एक असतो आपल्याला काय मिळवायचे आहे. तो वाला आणि एक आपल्याला काहीही मिळवायचं असेल पण मिळेल ते मुकाट घेण्याचा. मग विचार येतो मी कुठे? ?

मिळवण्यावाला कि मुकाट जे मिळतंय ते घेणारा.

असं ते काम करून मी परत येत होतो.. काम जे प्रत्येकाला करावंच लागतं. कारणे वेगवेगळी पण करावंच लागतं.

संध्याकाळ होती थोडा पाऊसाचा येण्याचा अंदाज होता. जोरदार हवा सुरु होती. मुसळधार पाऊस येण्यापूर्वीची वादळी हवा. बाहेर सर्वत्र आवरा-सावर सुरु होती.

मी बाहेर त्या पाऊसाची वाट पाहत होतो. मनात एक आनंद आणि एक स्वप्न, एक इच्छा न राहून येत होती. असा जोरदार पाऊस यावा, विजांचा कडकडात, पाण्याच्या धाराच्या खडखड करणारा आवाज आणि त्या तुफानी पाऊसात

आजू-बाजूला कुणीच नसावं आणि सोबत “ती” असावी... दोघांनीही त्या आनंदाच्या पाऊसात मनसोक्त भिजावं... इतक्यात नजर समोर गेली, आणि माझ्या त्या स्वार्थी, स्वताला आनंद देणाऱ्या त्या स्वप्नाचा भंग करत समोर असलेली सत्य स्थिती मला दिसू लागली. बऱ्याचदा डोळयांवर स्वार्थाचा, चष्मा लावल्यामुळे समोरची सत्य परिस्थिती दिसत नाही... त्यासाठी डोळयांवरचा चष्मा काढावा लागतो.

कसं असतं ना, जो पर्यंत आपण स्वप्नात असतो तो पर्यंत सर्व किती छान असतं, वस्तू, स्थिती तशीच घडते जशी आपल्याला वाटते. पण ते सर्व पाहिलेल्या स्वप्नात बरं का. बऱ्याचदा **स्वप्नात आपल्या हातात काहीच नसतं जे येईल ते बघावं लागतं, अगदी कामा सारखं. पण याउलट सुद्धा बऱ्याचदा स्वप्नात सर्वकाही आपल्या हातात असतं जे आपण पाहू तेच पुढे घडत जातं**.

एक विचार सहज येऊन गेला.

त्या स्वप्नातून बाहेर येत मी त्या समोरच्या परिस्थितीकडे पाहू लागलो.

बाहेर सर्व आपआपले सामान साहित्य जमा करत होते. जे त्यांची उपजीविका भागवत होतं ते सर्व ते जमा करत होते.

एक मी होतो जो या येणाऱ्या पाऊसाची वाट पाहून मनात खूप साऱ्या गोष्टी विचार करत होतो.

पण इथे लोकांचा आजच्या दिवसाशी संघर्ष सुरु होता.

समोर एक बाबा बसले होते. इतक्यातच त्यांनी आपला सर्व भाजीपाल्याचा सामान मस्त छान पैकी विकण्यासाठी ठेवला होता. त्यांच्याजवळ एक खेचर होता ज्याने त्यांचे सर्व साहित्य एका मालगाडीवर वाहून आणलं होतं. त्याला बाजूला बांधून त्यानी आपले सर्व दुकान लावलं होतं. दुकान म्हणजे एका सोसाईटीच्या बाहेर खाली जमिनीवर आपलं सर्व भाजी पाल्याच्या वस्तू मांडल्या होत्या. पण आता या पाऊसामुळे थोडी मनात शंका होती आजच्या दिवसाची. हा दिवस पूर्ण कसा होईल याची, तो संपेल कसा याची.. आणि ती चिंता ती शंका चेहरा वाचणाऱ्याला लगेच कळेल इतकी ती दर्शनीय होती.

मी तेथून गेलो. माझ्या घरी आलो.. ती जागा सोडून तेथून कधीच निघालो. मात्र न राहून ती जागा, ते लोक मी माझ्या सोबत विचारात घेऊन आलो होतो.

आणि सोबत खूप विचार सुद्धा..

विशेष करून ते म्हातारे बाबा...

जे या वयातसुद्धा स्वतः काम करत होते..

आयुष्याचं कसं असतं ना..

कोणाला काय, कधी करावं लागेल हे सांगता येत नाही..

पण एक गोष्ट नक्की होती.

का बरं ते इतक्या थकलेल्या वयात काम करत होते.

का त्यांना काम करावं लागत होतं. माझ्या मनात असले हजारो प्रश्न येत होते. **पण प्रश्नांनी कुठे समाधान होतं. प्रश्न हे परिस्थिती अस्थिर करण्यासाठीच असतात.**

आता रात्र झाली होती.

**रात्र म्हणजे विशेष, खूप अर्थाने. प्रत्येक जण तिची वाट पाहत असतो, कुणी कशासाठी तर कुणी कशासाठी.**

**थकेल्याना आराम,**

**आराम केलेल्याला काम**

**विचार करणाऱ्यांना विचार आणि बाकीच्यांसाठी झोप आणि झोपेत.... स्वप्न @@@ अशा खूप साऱ्या गोष्टीसाठी ची रात्र..**

मीही त्या पैकी एक करत झोपलो..

मात्र एक गोष्ट ती मनातून जाता जात नव्हती. ते म्हातारे बाबा, आणि त्यांना करावं लागणारं काम.

पण एका गोष्टीचं समाधान होतंच कि, ते कुणा कडून भिक मागत नव्हते.

आज मी तिथे जाऊन त्यांना भेटायचं ठरवलं.. कारण बऱ्याचदा आपण बाहेरून पाहतो..

**मात्र स्थिती तशीच असते का जसं आपण विचार करतो.**

**कारण आपण जे विचार करतो ते फक्त आणि फक्त आपल्या बुद्धीच्या मर्यादेपर्यंतच.. आपल्या क्षमते पर्यंत असतात..**

सकाळ झाली मी आज सकाळी त्या सोसाईटीच्या कंपाऊड जवळ गेलो. रस्त्याने जाता जाता मनात खूप प्रश्न तयार करत होतो. कि त्या बाबांना सर्व विचारावं, त्यांच्या मनातलं बाहेर काढावं.. @@

पण तिथे पोहचेपर्यंत तर पूर्ण निराशा झाली होती. त्या जागी जिथे बाबा आपले दुकान लावत ती जागा रिकामी होती ती जागा अगदी शांत होती तिथे कुणीच नव्हतं.

मी निराशेत परत आलो.

रस्त्याने येताना खूप भाजी विकणारे दिसत होते. मात्र मी फक्त त्या बाबांचा विचारात होतो.

मी तिथे असलेल्या एका व्यक्तीला विचारलं त्या म्हाताऱ्या बाबां बद्दल.

तेव्हा त्याने सांगितलं कि म्हातारे बाबा फक्त संध्याकाळी येतात....

मी सहज कारण विचारलं

तो व्यक्ती म्हणाला... त्यांची पत्नी आजारी असते आणि त्यासाठी तिची काळजी घेण्यसाठी ते घरी असतात...

मनात प्रश्नाचा पूर आल्यासारखे प्रश्न येऊ लागले पण त्यांना आवरता मी विचारलं... त्यांना मुले नाहीत का?

त्यावर त्या माणसाचं उत्तर होतं

मुले आहेत पण त्यांचा सांभाळ करत नाही, आजी आजारी असते म्हणून ते बाबा फक्त संध्याकाळी येतात... आणि सकाळी दुकान लावायला जागाहि नसते, उनहि खूप जास्त असतं आणि अशात लोक सावलीतील दुकानात जातात. म्हणून ते दुपारी न लावता संध्याकाळी दुकान लावतात.

**एक गोष्ट तर खरी होती. लोकं सावलीतील दुकानात लवकर जातात. लोकं सर्व गोष्टी स्वतःच्या सोयीनुसार करतात..... अगदी मैत्री, नाते आणिव्यवसायसुद्धा....**

घरी आलो संध्याकाळ झाली होती. आता मी लवकरच निघालो. त्या जागी येऊन थांबलो त्या बाबांच्या अगोदर मीच तिथे येऊन थांबलो होतो. मी वाट पाहत होतो अर्थात हे असं करण्यात काही विशेष असा उद्देश नव्हता. पण एका गोष्टीचं विशेष वाटत होतंच ते म्हणजे, आजूबाजूला त्या पेक्षा कमी वयाचे, शरीराने धडधाकट आणि उत्तम लोकं, श्रमाचे काम करण्यास तयार नव्हते. फक्त जे मिळेल ते घेत होते. ती भिक का असेना.

एका बाजूला ते दृश्य आणि दुसऱ्या बाजूला हे वेगळं दृश्य ज्यात आपल्या शारीरिक क्षमतेपेक्षा जास्त श्रम ते बाबा घेत होते. अर्थात तसं करण्याचं कारण मला कळालं होतं. म्हणून मी त्या ठिकाणी सकाळ पासून दोनदा आलो होतो.

मनात विचार सुरु होते. तितक्यात समोरून एक खेचर माल गाडी ओढत येत होतं आणि सोबत बाबा हळू हळू आले. ती गाडी त्यांच्या नियोजित जागी आली. बाबा त्या सोसाईटीच्या गेट समोर असलेल्या जागेवर आपलं दुकान मांडत होते. त्यांनी आपला साथी, मदत करणाऱ्या त्या खेचराला बाजूला एका झाडा खाली बांधले. पण तेवढ्यात तिकडून सोसाईटी चा गार्ड येऊन बाबांना काहीतरी सांगू लागला.

ते ५ मिनीटाचं संभाषण संपवून झाल्यावर बाबांच्या चेहऱ्यावर थोडी निराशा आली आणि तेथून आपले सर्व साहित्य घेऊन थोड्या अंतरावर दुसऱ्या जागी त्यांनी आपलं दुकान मांडलं. हे सर्व मी दुरूनच बघत होतो.

मात्र हे समजण्यासाठी मला एका क्षणाचाहि वेळ लागला नाही, कि त्या गार्ड ने बाबांना तिथे दुकान न लावण्याचं सांगितलं होतं. पण एक विशेष, त्या अपमान किंवा त्रासामुळे ते बाबा, त्या गार्डसोबत हुज्जत घालत नव्हते. फक्त हसत विचार करत त्यांनी जागा बदलवली. मग मला त्यांच्याशी बोलायला जाण्याचं कारण मिळालं. मी पुढे गेलो. त्या बाबांजवळ... त्यांना त्यांच्या आधीचा सर्व माल मी गाडीत टाकण्यासाठी मदत करू लागलो. नंतर दुसऱ्या जागी ते उतरवण्यात मदत करू लागलो.

हे करतांना मला त्यांच्याशी बोलायचं होतं हा उद्देश होता.

**असं नव्हतं कि मी त्यांच्याशी बोलू शकणार नव्हतो. पण, ते बोलणं फक्त एक ग्राहक आणि आणि विक्रेत्याचं राहिलं असतं. माझ्या व्यक्तिगत अनुभवा वरून एक गोष्ट मी नक्की सांगू शकतो कि, त्या बोलण्यात काहीच तथ्य नाही ज्यात भावनांचा प्रवाह नसेल**.

आणि तो प्रवाह आणण्यासाठी, वेगळया पद्धतीने बोलणे गरजेचे असते. मग ते बोलणे कोणतेही असो, एखाद्या नात्यातलं अथवा दुसरं काही वेगळं.

म्हणून मी त्यांचाशी भावनिक दृष्ट्या जुळण्यासाठी प्रयत्न करत होतो. याचा अर्थ असा नाही कि फक्त भावनिक दृष्ट्या मदत करत होतो. मदत करणे, भावनिक असणे हे मानवाच्या मानव असण्याच्या लक्षणापैकी एक आहे. अर्थात ते आज काल थोडं कमी प्रमाणात आहे. पण नाही असं नाही.

सर्व साहित्य बाबांचं मांडून झालं. माझ्या मनात एक प्रश्न कधी पासून येत होता. तसे प्रश्न खूप होते. मात्र, एक प्रश्न आता विचारणं गरजेचं वाटत होतं.

बाबा एक विचारू

हो बाळा विचार,

मगाशी त्या गार्ड ने तुम्हाला त्या जागेवर दुकान मांडू नाही दिलं, मनात राग नाही आला का?

राग कशासाठी पण, बाबांनी प्रश्नावर प्रश्न केला.

त्यांनी तुम्हाला तिथून हटकून लावलं, त्यासाठी... थोडं अपमान झाल्या सारखं नाही का वाटलं?

नाही रे मुला,

अर्थात तसं का वाटावं हा मुळात प्रश्न आहे.

ती जागा त्यांची, तो गेट त्यांचा,

तिथे येणाऱ्या लोकांना त्रास, तो त्रास जरी त्यांचा असला तरी तो त्रास मात्र आपल्यामुळे होता. मग आपल्यामुळे त्यांना त्रास नकोच. हसत एक सर्वात महत्वाचं वाक्य ते सहज बोलून गेले,

**मुला एक लक्षात ठेवावं कायम,**

**कुठेही जाताना, मागताना, काहीही काम करताना. दोन गोष्टी होतीलच हे ठरलेलं असतं,**

**एक तर जे करतोय, मागतोय, जे काहीहि असेल**

**ते पूर्ण होईल अथवा नाही.**

**“हो किंवा नाही” या व्यतिरिक्त दुसरं काही असतं का जगात.**

**आणि राहिली गोष्ट अपमानाची.**

**कुठेही जाताना**

**आपला अपमान होऊ शकतो हि शक्यता धरूनच गेलं पाहिजे,**

**“कारण आज काल सर्व लोक आप-आपला मान, सन्मान वाचवायचा प्रयत्न करतात आणि त्या प्रयत्नात दुसऱ्या कुणाचा अपमान होत आहे, हे निव्वळ विसरतात. ”**

म्हणून आपण जातांनाच तसं गृहीत धरून जावं. मग कसला “त्रास नी कसला अपमान”, बाबांच्या चेहऱ्यावर एक हास्य छटा उमटून गेली.

फक्त एक गोष्ट मात्र कायम स्मरणात असावी. **“मागताना हक्काच मागावं, भिकेचे मागणे नकोच कधी, मग ते मागणे काहीही असो... पण हक्काचे असावे, भिकेचे नाही.**

**लोकांनी आपल्यावर प्रेम करावं..... दया नाही.**

**मग मागण्यात पैसा, धन, चैंनीच्या वस्तू असो**

**किंवा नातं, प्रेम आणि अजून काही... ते हक्काचं असलं पाहिजे, भिकेचे नको. कधीच नको.**

आपला मार्ग मग तो तर सत्याचा असला तर मग त्रास होत नाहीच.

त्यात आपला स्वाभिमान पण टिकून राहतो.

हे सर्व करे पर्यंत आमचा सर्व साहित्य मांडून झालं होतं.

या आधी मी बाबांना लांबूनच पाहिलं होतं.

मात्र जवळ जाऊन पाहण्यात खूप फरक होता.

शारीरिक कष्ट करण्याची शक्ती नसतांनासुद्धा ते कष्ट ते घेत होते, आणि त्या कष्ट घेण्यात त्यांना आनंद होता.

**माणसाचे विचार हेच त्याला बळ देत असतात.**

**एखादा सक्षम व्यक्ती असेल मात्र त्याचे विचार सक्षम नसतील तर तो एखादं काम तितक्या चांगल्या पद्धतीने नाही करू शकत, त्याच जागेवर एखादा दुसरा व्यक्ती तितका सक्षम नसला तरी एखादं काम सहज करून जातो. सर्व खेळ विचारांचा आहे.**

आता मी तेथून निघालो होतो मात्र मन ते अजून त्याच बाबांच्या आणि त्यांच्या विचारात होतं.

ऐरवी मी पाहिलेलं काही नवीन अथवा क्वचित घडणारं नव्हतं. ते अगदी रोज दिसणारं होत.

काही लोक खूप मेहनत करता पण त्याचा मोबदला त्यांना मिळत नाही.

ज्याला गरज आहे त्याचीच ती गरज पूर्ण होत नाही.

कष्टाने काम करणाऱ्याला त्रास होतो. मात्र..

चुकीचं काम करणारे हरामखोर लोकं समाजात अगदी मान वर करून मिरवत फिरतात.

माझ्या मनात अशा खूप साऱ्या गोष्टींचा विचार सुरु होता.

ती मनातली धगधग कुणाला तरी सांगावी.

मग मनात विचार आला नवीन प्रयोग करून पाहण्याचा.

जर मी फक्त हे चुकीचं होताना बघत असेल, तरी मला इतका त्रास.. मग जे प्रत्यक्षात अनुभवत असतील त्यांना किती त्रास होत असावा.

ते काय विचार करतात. हे मी जाणून घेण्याचं ठरवलं.

उत्तर सरळ होतं कि त्यांनाही त्रास होत असेलच..

पण ते मी ठरवणं योग्य नव्हतं. अर्थात..

**माणसाने स्वत कधीच दुसऱ्याचं मत ठरवू नये...**

**जाणून घ्यावं.. पण ठरवू नये..**

म्हणून मी जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

मी दुसऱ्या दिवशी त्याच बाबांच्या मांडलेल्या दुकाना जवळ आलो.

आणि सहज बोलायला सुरुवात केली..

आमच्यात या आधी बोलणं झालं होतं म्हणून काही सर्व ठीक होतं.

मी बाबांना विचारलं..,

“बाबा तो बाहेर एक दुकानदार आहे तो हाच भाजी जास्त भावाने विकतो आणि लोक घेता.. ”

तुम्हाला राग नाही येत का?

मला वाटलं, प्रश्न बरोबर आहे आणि बाबा चिडतील आणि त्यांच्या मनातलं सांगतील.

मात्र झालं जरा उलटच.

बाबा हसू लागले आणि बोलू लागले.

राग.. कसला राग यायला पाहिजे मला..

अर्थात लोकांना राग कशाचा करावा हेच मुळात माहित नाही.

राग हा चुकीच्या गोष्टी बद्दल असावा

मी म्हटलो.

बरोबर...

माझ्या बोलण्याला होकार देत बाबा पुढचं वाक्य सहज बोलले,

**“पण सर्वात आधी त्या चुकीच्या गोष्टी स्वताच्या आत शोधाव्यात मग दुसऱ्याकडे वळावं.. ”**

**लोक राग असा करतात...... जसं कि ते कायम बरोबरच असतात.**

आणि राहिली गोष्ट मला राग येण्याची.

मला त्याचा राग येत नाही,

कारण तो त्याचं काम करतो आहे.. आणि लोकं त्याच्या कडून त्या भावाने घेत आहेत म्हणजे लोकांना पण काही त्रास नसेलच.

पण मग तुम्ही कमी भावाने विकता तरी.. मी मध्येच विचारलं.

हे बघ बाळा. फक्त आज आणि या व्यवसाय पुरता मर्यदित न राहता सांगतो.

तो निर्णय त्या लोकांचा असतो कि “कुठून घ्यावं, आणि काय घ्यावं. ”

त्यांना योग्य वाटतं तेव्हाच ते घेतात. त्यांच्या त्या निर्णयावर आपण जबरदस्ती करूच शकत नाही. तशी जबरदस्ती कुणावरच करू नये. जरी मी कमी भावाने, कमी दरात वस्तू देत असलो तरी.

मला खूप साऱ्या प्रश्नांचे उत्तर एकाच उत्तरात मिळालं होतं.

पण तरी मी एक प्रश्न केलाच,

“बाबा, जेव्हा चुकीचे लोकं, चुकीचं काम करून पैसा कमावतात, सन्मानाने फिरतात, ज्यांना गरज नसते तरी त्यांच्याकडे सर्व असतं आणि ज्याला गरज असते त्याच्याजवळ पुरेसंसुद्धा नसत, मग तेव्हा तुम्हाला देवावर राग नाही येत का? ? ”

मुळात राग हा कुणावरच करू नये आणि करायचाच असेल तर आधी स्वतःवर करावं कारण खूप साऱ्या चुका तर आपण स्वतः रोज करत असतो.

राहिली गोष्ट देवाची..... त्याला त्याचं काम करू द्यावं.... आपण आपलं काम करावं. जर प्रत्येकाने ज्याचं त्याचं काम नीट केलं. तर काही त्रासाच उरणार नाही.

बाबा सहज आणि खूप सरळ ते वाक्य बोलून गेलेत.

व्यक्ती पैशाने नाही तर विचाराने मोठा असला पाहिजे.

**दुसऱ्याच्या चुका शोधणं जरी सोपं असलं तरी स्वतःच्या चुका स्वीकारणे अवघड आहेच.**

बाबा अगदी सहज त्या प्रत्येक त्रास देणाऱ्या गोष्टी ला वेगळं, साधं सरळ

रूप देत होते... शेवटी कितीही केलं ते एक सत्य होतंच...

**एखाद्या गोष्टीचा परिणाम हा आपण त्या गोष्टी ला किती महत्व देतो यावर अवलंबून असतो....**

मी बाबांचा निरोप घेतला... आणि माझ्या घराकडे निघालो... मात्र आज आणि पुढे आयुष्य भर त्या बाबांना अनुभवात सोबत घेतलं होतं... कारण आयुष्यात अशा गोष्टी कायम होतात.. ज्या आपल्याला विनाकारण त्रास देतात आणि त्यावेळी त्या कशा हाताळायच्या हे या बाबा पेक्षा जास्त मला कुणीच शिकवू शकलं नसते...

**जगात आपला स्वतःचा विचार करतांना इतरांचा विचार लोकं करत नाही हे जरी सत्य असलं तरी त्यावेळी कोणत्या गोष्टी ला अधिक महत्व द्यावं हे सर्वस्वी आपल्यावर अवलंबून असतं..**

असे किती तरी न माहित असलेली प्रश्नाची उत्तरे आणि शिकवण ते बाबा त्यांच्या वागण्यातून देऊन गेले. आणि शेवटी ज्याची सर्वांना आवश्यकता असते अशा पाठीवर हातसुद्धा त्या उत्तरांना आणि त्या पाठीवरच्या आशीर्वादाची थाप घेऊन मी त्या सर्व गोष्टी मनात साठवत माझ्या घराकडे परत येऊ लागलो.

---



डोक्यावर कायम ती भार वाहते, याचा..... त्याचा..... आणि त्या सर्वांचा.... तेही कुणाकडून कुठलीही अपेक्षा न करता...

मग का तिला असं रस्त्यावर फिरावं लागतं निराधार सारखं....

जी सर्वांचा आधार बनून आयुष्य घालवते का तिला स्वतःला आधार मिळत नाही..... का? ? ? ?



आणि शेवटी का तिला लाचार व्हावं लागतं..? ? ? ?

जिच्या जीवावर प्रत्येक मनुष्य मग तो पुरुष असो वा स्त्री... पती असो मुलगा कि नातू किंवा अजून कुणी... ती प्रत्येकाचा आधार असते मग का ति स्वतःच निराधार होऊन फिरते.. का? ? ? ?



धन्यवाद......

माणसाला एखाद्याचं दुःख वाटून घेण्याचं शिकवावं लागत असेल... तर मग मनुष्याच्या जातीवर बरेच प्रश्न उपस्थित होतील....

असं नाही आपले सर्व काम सोडून फक्त इतरांना मदत करत फिरा.... नाही, तसा उद्देश नाहीच त्यासाठी खूप सारे लोकं काम करत आहेतच. पण आपल्या मार्गाने, रस्त्याने जाताना वाटेत कुणाला मदतीची गरज असली तर ती केल्याशिवाय राहू नका... बस्स मग तुमचा आणि इतरांचा आनंद नक्की द्विगुणीत होईल.. आणि हे मी philosophy म्हणून नाही.

स्वतःच्या आता पर्यंतच्या लहान आयुष्यातील अनुभवावरून सांगू शकतो आणि तेही अगदी निर्विवाद पणे........

@BE HAPPY

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात . ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

esahity@gmail.com

www.esahity.com